# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172


*No: CGRF/AZ/AUR/ U / 263 / 2009 / 97/ Date :-*

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,*
*Aurangabad.*

*Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Pundlik Namdev Chaudhari. Gut no. 105, Plot No.43, Sainath Nagar, Satara Parisar, Beed Road, Aurangabad. (Consumer No.49011428344 )*

*Dear Sir,*

*Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Forwarding of grievance in respect of Shri Pundlik Namdev Chaudhari. Gut no. 105, Plot No.43, Sainath Nagar, Satara Parisar, Beed Road, Aurangabad.*

*You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 15.12.2009 at 11= 30 Hrs. onwards.*

*Encl: As above*

*Member/Secretary*
*CGRF(AZ) MSEDCL*
*Aurangabad.*

Copy to:-

*Shri Pundlik Namdev Chaudhari.*
*Gut no. 105, Plot No.43, Sainath*
*Nagar, Satara Parisar, Beed Road,*
*Aurangabad.*

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२६३/२००९/९७**

**तक्रार दाखल दिनांक :- ३०/११/२००९**
**निकाल दिनांक :- १५/०१/२०१०**

**श्री पुंडलीक नामदेव चौधरी,**
**गट नंबर १०५, प्लॉट नंबर ४३,साईनाथ नगर,**
**सातारा परीसर बीड रोड,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११४२८३४४) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |
| | **वि. सु. काबरा** | **सदस्य** |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर ’अनुसुची - अ’ मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ३०/११/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १५/१२/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००११४२८३४४ असा आहे.दिनांक २९/०६/२००९ रोजी महावितरण कंपनीचे तीन कर्मचारी कोणतीही पुर्व सुचना न देता दुपारी अंदाजे एक वाजता वीज ग्राहकाचे घरी आले त्यावेळी वीज ग्राहक आपले दैनदिंन नोकरीच्या कामावर होते घरी त्यांची पत्नी होती. आलेल्या कर्मचा-यांनी कुठलीही ओळख न देता त्यांचे घरातील मीटर काढुन घेतले मीटर काढण्याबाबत त्यांनी कोणताही खुलासा केला नाही व घरातील उपस्थित व्यक्तीची सही घेतली नाही.कर्मचा-यांनी दुसरे मीटर घराबाहेरील खांबावर बसवुन दिले. त्यानंतर अंदाजे महीन्याभराने ग्राहकास वीज कायदा २००३ चे कलम १३५ असा उल्लेख असलेले रुपये १७,६७०/- चे देयक देण्यात आले तसेच कंपौडींग चार्जेस रुपये ८,०००/- चे दुसरे देयक देण्यात आले. वरील देयकाची चौकशी करण्याकारीता ग्राहक महावितरण कंपनीच्या संबंधित उपविभागीय कार्यालयात गेले असता त्यांना आपण विजेची चोरी केली असल्यामुळे वरील देयक देण्यात आले असल्याचे सांगीतले.वीज चोरी बाबत देयक देण्यापुर्वी ग्राहकाकडे त्याचे मीटरची तपासणी करण्याकरीता महावितरण तर्फे कोणीही अधिकारी अथवा कर्मचारी आले नाहीत केवळ त्यांचे जुने मीटर बदली करुन नवीन मीटर घराच्या बाहेरील खांबावर बसविण्यात आले, तसेच घटनास्थळ पंचनामा करण्यात आला नाही,मीटरची जप्ती पंचनामा करण्यात आला नाही कोणत्याही कागद पत्रावर वीज ग्राहाकाची अथवा त्यांच्या कुंटुबीयांची सही घेण्यात आली नाही व मीटरची कोणतीही चाचणी करण्यात आली नाही. वीज चोरी बाबत

वीज बिलाच्या व्यतीरीक्त कोणतेही लेखी पत्र ग्राहकास देण्यात आले नाही ग्राहकाने पुढे असेही सांगीतले की,वरील घटनेनंतर त्यांना त्यांच्या मीटर वाचना नुसार नियमीतपणे वीज देयक देण्यात येत असुन त्यांचा भरणा ग्राहक करीत आहे व ग्राहकाचा वीज पुरवठा बंद करण्यात आला नाही. वरील अवास्तव वीज बिल चुकीचे व अन्याकारक असल्यामुळे ते रद्द करण्यात यावे अशी विनंती ग्राहकाने महावितरण कंपनीच्या संबंधित अधिका-याकडे केली परंतु त्याबाबत दखल घेण्यात आली नाही व वीज देयक न भरल्यास वीज पुरवठा बंद करण्यात येईल या भीतीपोटी ग्राहकाने मंचात तक्रार दाखल केली आहे. महावितरण कंपनीने चुकीचा आरोप करुन देण्यात आलेले अवास्तव देयक रद्द करावे व झालेल्या मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई म्हणुन रुपयें ४,०००/- देण्यात यावे अशी विनंती ग्राहकाने मंचास केली.

२) दिनांक १५/१२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी श्री पी.आर.तौर व श्री खडके सहाय्यक लेखापाल तसेच वीज ग्राहक श्री पी.एन.चौधरी उपस्थित होते. ग्राहकाने त्यांची तक्रार वरील प्रमाणे कथन केली.नोडल अधिकारी यांनी त्यांची बाजु माडतांना सांगीतले की, वीज ग्राहकाच्या घरी दिनांक २९/०६/२००९ रोजी उपकार्यकारी अभियंता भरारी पथक यांनी स्थळ निरिक्षण केले असता. त्यांना वीज ग्राहक मीटर बायपास करुन वीज पुरवठा वापरत असल्याचे आढळुन आले त्यामुळे त्यांनी स्थळ निरीक्षण अहवाल तयार केला स्थळ निरिक्षण अहवालानुसार वीज ग्राहक मीटरच्या इनकमींग टर्मीनल मध्ये निळ्या व लाल रंगाचा वायर जोडुन व मीटर बायपास करुन वीज पुरवठा वापरत असल्याची नोंद केली आहे.त्यामुळे ग्राहकास वीज चोरीबाबत भा.वि.का. २००३ चे कलम १३५ नुसार रुपये १७,६७०/-चे देयक व तडजोडीबाबत रुपये ८,०००/- चे देयक देण्यात आले.मंचाने नोडल अधिकारी यांना स्थळ पंचनाम्याची प्रत,एफ.आय.आर. ची प्रत व बिलनिर्धारण शीट सादर करण्याचे सांगुन पुढील सुनावणी दिनांक २२/१२/२००९ रोजी ठेवण्यात आली,

३) दिनांक २२/१२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी श्री पी.आर.तौर, श्री खडके व वीज ग्राहक उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर करुन सांगीतले की, वरील ग्राहकाचे घराचे निरिक्षण उपकार्यकारी अभियंता भरारी पथक यांनी केलेले आहे व स्थळ पंचनामा सुध्दा त्यांनीच केलेला आहे.परंतु स्थळ पंचमाम्याची प्रत व एफ.आय.आर.ची प्रत मागणी केल्यावर सुध्दा त्यांनी उपलब्ध न करुन दिल्यामुळे मंचास सादर करु शकत नाही.त्यांनी अधिक्षक अभियंता औरंगाबाद शहर मंडल यांचे उपकार्यकारी अभियंता भरारी पथक यांना लिहीलेले पत्र क्रमांक ६४९७ दिनांक १९/१२/२००९ सादर केले.वीज ग्राहकाने लेखी सादर केले की त्यांनी कोणतीही वीज चोरी केली नाही तसेच त्यांचे घरी स्थळ पंचनामा करण्यात आला नाही, त्याची कोणत्याही कागदावर सही घेण्यात आली नाही व कोणतेही दस्तऐवज देण्यात आले नाही.दिनांक २९/०६/२००९ रोजी त्यांचे केवळ मीटर बदली करण्यात आले.जालना पोलीसस्टेशनचे कर्मचारी त्यांच्यावर वीज चोरीचे देयक भरण्यासाठी दबाव आणत आहेत.त्यांनी कोणतीही वीज चोरी केलीनसल्यामुळे वीज चोरीबाबतचे देयक रुपये १७६७०/- व रुपये ८०००/- रद्द करण्यात यावे अशी विनंती मंचास केली. दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकुन घेतल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवण्यात आले.

४) मंचाची सुनावणी संपल्यानंतर नोडल अधिकारी यांनी दिनांक २३/१२/२००९ रोजी लेखी पत्र सादर करुन वरील प्रकरणात मंचाने मागणी केलेले स्थळ पंचानामा व एफ.आय.आर.ची प्रत सादर करण्यास वेळ मिळण्याबाबतचा अर्ज सादर केला. मंचाने वरील अर्जानुसार नोडल अधिकारी यांना दिनांक ३१/१२/२००९ पर्यंत मुदतवाढ देवुन वरील दस्तऐवज सादर करण्याचे सांगीतले. नोडल अधिकारी यांनी दिनांक ३१/१२/२००९ रोजी स्थळ निरिक्षण अहवाल, एफ.आय.आर. व पोलीस तक्रारीची प्रत सादर केली.

५) दोन्ही बाजुकडुनचे म्हणणे ऐकुण घेतल्यानंतर व सादर करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसुन येते की, उपकार्यकारी अभियंता भरारी पथक यांनी दिनांक २९/०६/२००९ रोजी केलेल्या ग्राहकाच्या स्थळ निरिक्षण अहवालावर ग्राहक मीटर बायपास करुन मीटर चे इनकमींग टर्मीनल पॉईट मधुन लाल व निळ्या रंगाच्या वायरद्वारे वीज पुरवठा वापरत असल्याचे नमुद केले आहे. तसेच स्थळ निरिक्षण अहवालावर ग्राहकाची सही नसुन त्याठिकाणी ग्राहकाने सही करण्यास नकार दिल्याचे नमुद केले आहे. स्थळ पंचनाम्याचे निरिक्षण केले असता त्यावर सुध्दा ग्राहकाची सही आढळुन येत नाही. उपकार्यकारी अभियंता भरारी पथक यांनी दिनांक २९/०६/२००९ रोजी स्थळ निरिक्षण करुन त्याचा अहवाल दिनांक ३०/०६/२००९ रोजी कलम १३५ अंतर्गत वीज देयक निर्धारण करण्याकरीता उपकार्यकारी अभियंता उपविभाग छावणी यांना सादर केले असल्याचे दिसुन येते, परंतु उपकार्यकारी अभियंता छावणी यांनी १४/०७/२००९ रोजी वीज देयक तयार करुन जवळपास १ महीन्यानंतर ग्राहकास वितरीत केल्याचे दिसुन येते.वरील देयकाचा भरणा ग्राहकाने अजपर्यंत केलेला नाही परंतु महावितरण कंपनीने वीज कायदा २००३ मध्ये तरतुद असतांनाही ग्राहकाचा वीज पुरवठा आज पर्यंत खंडीत केला नाही. महावितरण कंपनीने त्यांचे वाणिज्य परीपत्रक क्रमांक ९९ दिनांक २९/०८/२००९ नुसार वीज चोरीच्या प्रकरणात भा.वी.कायदा. २००३ चे कलम १३५ अंतर्गत २४ तासाच्या आंत पोलीस तक्रार दाखल करण्याच्या सुचना त्यांच्या क्षेत्रीय अधिका-यांना दिलेल्या आहेत परंतु वरील प्रकरणात १ महिन्यानंतर म्हणजे दिनांक ३१/०७/२००९ रोजी फिर्याद दाखल केल्याचे दिसुन येत आहे.

६) वीज चोरी प्रकरणाचे कारवाही बाबत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग विनियम २००५ चे कलम ८.४ खालीलप्रमाणे आहे.

*'' अधिनियमाच्या भाग १२ किंवा भाग १४ मध्ये उल्लेखलेल्या स्वरुपाचा अपराध ग्राहकाच्या जागेवर होत असल्याचा संशय येण्यास कारण असेल तर अशा*

*जागेस राज्य शासनाने अधिनियमाच्या कलम १२६ खाली पदनिर्देशीत केलेल्या अधिका-याने किंवा राज्य शासनाने अधिनियमाच्या कलम १३६ खाली प्राधिकृत केलेल्या अधिका-याने दिलेल्या भेटीची नोंद,*
*वितरण परवानेधारकाने ठेवलेल्या नोंद-वहीत अशा अधिका-याचे नांव व ग्राहकाच्या जागेस दिलेल्या भेटीच्या तपशीलासह, ठेवण्यांत येईल.*
*परंतु पुढे असे की, जेथे शक्य असेल तेथे,भेटीसाठी दोन स्वतंत्र साक्षीदार नेण्यांत येतील आणि अशा अधिका-याने ग्राहकाच्या जागेस दिलेल्या भेटीच्या निष्कर्षाबाबतचा एक तपासणी अहवाल तयार करण्यात येईल, ज्यावर ग्राहकाने आणि/ किंवा त्यांच्या प्रतिनिधीने, त्याचे अभिप्राय असल्यास त्यासह, आणि अशा साक्षीदारांनी सह्या केलेल्या असतील.*
*परंतु असेही की,ग्राहकाने अथवा त्याच्या प्रतिनिधीने तपासणी अहवालावर सही करण्यास नकार दिल्यास त्याची देखील नोंद तपासणी अहवालांत करण्यात येईल.*
*परंतु असेही की, ग्राहकाने विनंती केल्यास तपासणी अहवालाची एक प्रत त्याला देण्यात येईल.''*

वरील प्रकरणात, स्थळ निरिक्षण अहवाल व घटना स्थळ पंचनामा यावर ग्राहकाच्या किंवा उपस्थित ग्राहकप्रतिनिधीच्या सह्या घेण्यात आल्या नाहीत व ग्राहकाने अथवा त्याच्या प्रतिनिधीने पंचनाम्यावर सही करण्यास नकार दिल्याची नोंद देखील पंचनाम्यावर घेण्यात आलेली नाही तसेच पंचनाम्याची व स्थळ निरिक्षण अहवालाची प्रत सुध्दा ग्राहकास देण्यात आली नाही. त्यामुळे आयोगाने वरील कलमाद्वारे दिलेल्या सुचनांचे उल्लंघन झालेले आहे.
भा.वि.कायदा २००३ चे कलम १३५ अंतर्गत वीज चोरीचे प्रकरणात कारवाई करतांना वीज चोरीच्या ठिकाणी वापरण्यात आलेली उपकरणे, वस्तु ,वायर जप्त करुन व जप्तीनाम्यावर ग्राहकाच्या अथवा ग्राहक पतिनिधीच्या सह्या घेऊन जप्तीनाम्याची प्रत ग्राहकास देणे आवश्यक आहे. परंतु वरील प्रकरणात ग्राहकाने वापरलेले मीटर,पंचनाम्यात नोंद केलेली वायर व वापरण्यात आलेले बोर्ड व स्विच यांचा जप्तीनामा करण्यात आलेला नाही.

मंचाने मागणी केल्यानंतरही नोडल अधिकारी वीज चोरीबाबत अधिक पुरावा जसे घटना स्थळाचे छायाचित्र,व्हीडीओ क्लीप मंचात सादर करु शकले नाही.नोडल अधिकारी यांनी सदरचे प्रकरण भरारी पथकाने कलम १३५ अंतर्गत नोंद केल्यामुळे मंचाने ते दाखल करुन घेऊ नये व त्यावर मंचाने सुनावणी देखील करु नये असे प्रतिपादन केले.वरील बाबतीत म.वि.नि. आयोग ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ६.८ खालील प्रमाणे आहे.

*'' जर मंचाचे सकृत्दर्शनी असे मत झाले की,त्याच्याकडे पाठविण्यात आलेली गा-हाणी अधिनियमाच्या खालील कोणत्याही तरतुदीच्या कक्षते येणारी आहेत तर ती मंचाच्या अधिकारक्षेत्रांतून वगळण्यात येतील-*

*१) अधिनियमाच्या कलम १२६ मध्ये तरतूर केल्याप्रमाणे विजेचा अनधिकृत वापर :*

*२) अधिनियमाच्या कलमे १३५ ते १३९ मध्ये तरतूद केलेले अपराध आणि दंड :*

*३) अधिनियमाच्या कलम १६१ खाली तरतुद करण्यात आलेले विजेच्या वितरण, पुरवठा व वापरासंबधातील अपघात : आणि*

*४) वाद नसलेल्या विजेच्या देयकातील थकीत रकमचे वसुली.''*

आयोगाच्या वरील सुचने नुसार वीज वितरण कंपनीने वीज चोरीच्या प्रकरणामध्ये, भा.वि.कायदा २००३ अधिनियम भाग १२ व १४ मधील तरतुदीस अधिन राहुन कारवाई केली असल्यास ती प्रकरणे मंचाचे अधिकार क्षेत्रातुन वगळण्या आलेली आहेत. परंतु महावितरण कंपनीच्या अधिका-यानी नोंदविलेली वीज चोरीची प्रकरणे वरील अधिनियमाच्या तरतुदीच्या कक्षेत येतात किंवा नाही हे पाहण्याचा अधिकार मंचास आहे.

वरील प्रकरणात महावितरण कंपनीच्या भरारी पथकाने भा.वि.कायदा २००३ चे कलम १३५, तसेच माननिय आयोगाने दिलेल्या सुचनांचे उल्लंघन केले व वीज कंपनीने परीपत्रकाद्वारे दिलेल्या मार्गदर्शक सुचनाचे सुध्दा पालन केले नाही.त्यामुळे महावितरण कंपनीने भा.वि.कायदा २००३ कलम १३५ अंतर्गत ग्राहकावर केलेली कारवाई योग्य नाही असे मंचाचे मत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास दिलेले कलम १३५ व कलम १५२ अंतर्गत वीज देयक अनुक्रमे रुपये १७,६७०/- व रुपये ८,०००/- चे वीज देयक रद्द करण्यात येत आहे.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

**विलासचंद्र सु. काबरा** **विष्णु अं. हंबिरे**
**सदस्य** **अध्यक्ष**

वरील प्रकरणात मी प्र.अ.सगणे सदस्य/सचिव खालील मुद्दयावर सहमती नसल्यामुळे वेगळे मत नोंद करीत आहे.

१) उपकार्यकारी अभियंता भरारी पथक यांनी वीज चोरीबाबत घटनास्थळावर तयार केलेला स्थळ निरिक्षण अहवाल व स्थळ पंचनामा सादर केलेला आहे.स्थळ निरिक्षण अहवालावर उपस्थित वीज ग्राहक प्रतिनिधीने सही करण्यास नकार दिल्याबाबत नोंद केली आहे.त्यामुळे स्थळ निरिक्षण अहवाल,स्थळ पंचनामा घटनास्थळावर करण्यात आला नाही असे गृहीत धरणे योग्य होणार नाही.

२) उपकार्यकारी अभियंता भरारी पथक यांनी वीज चोरी बाबत भा.द.वि.२००३ चे कलम १३५ अन्वये महावितरण अंतर्गत विशेष पोलीस स्टेशन जालना येथे तक्रार दाखल केलेली आहे. त्यामुळे म.वि.नि.आयोग विनियम २००६ चे कलम ८.६ नुसार वरील तक्रार मंचाचे अधिकार क्षेत्रातुन वगळणे योग्य होईल.

**प्र.अ.सगणे**
**सदस्य/सचिव**

ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.**

क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२६३/२००९/९७/ दिनांक :-

प्रति,

श्री पुंडलीक नामदेव चौधरी,
गट नंबर १०५, प्लॉट नंबर ४३,साईनाथ नगर,
सातारा परीसर बीड रोड,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००११४२८३४४)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/**२६३/२००९/९७** )

आपण दिनांक ३०/११/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे.'' महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २००६'' चे कलम ८.४ नुसार मंचाने बहुमताने दिलेला आदेश कारवाही योग्य राहिल. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती,सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.